**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विहार शिवाजीराव दुर्वे
५७३/१, पवन विहार, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे-५ अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज),
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.२०६)** उत्तरवादी
(१)**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त(ज),
पुणे महानगरपालिका, पुणे
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, मलनिःस्सारण प्रकल्प,
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.१८२)**
(२)**जन माहिती अधिकारी** तथा उपनगर अभियंता, मलनिःस्सारण प्रकल्प,
पुणे महानगरपालिका, पुणे
(३)**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त(वि),
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.१८३+१८४+१८५+२०५+२०७)**
(३)**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त(ज),
पुणे महानगरपालिका, पुणे
(४)**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(वि) तथा ,
करआकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे **(तक्रार क्र.८६)**
(४)**जन माहिती अधिकारी** तथा सहा.करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे
(५)**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता, पाणीपुरवठा विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.११०७)**
(५)**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, पाणीपुरवठा विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे

(५)**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता, (विकास योजना),
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.१४६०)**
(५)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे
(६)**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.१४६२)**
(६)**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, उपआयुक्त क्र.४,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६+१८२+१८३+१८४+१८५+२०५+२०७+११०७+१४६० +१४६१+१४६२ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विहार शिवाजीराव दुर्वे
५७३/१, पवन विहार, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे-५

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज),
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.२०६)** श्री.विरेंद्र जाधवराव
(१)**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त(ज),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.भानुदास माने
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, मलनि:स्सारण प्रकल्प,
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.१८२)** श्री.वि.गो.कुलकर्णी
(३)**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त(वि),
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.१८३+१८४+१८५+२०५+२०७)** प्रतिनिधी श्री.यशवंत खैरे
(४)**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(वि) तथा, करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे **(तक्रार क्र.८६)** श्री.विलास कानडे
(४)**जन माहिती अधिकारी** तथा सहा.करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.दयानंद सोनकांबळे
(५)**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता, पाणीपुरवठा विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.११०७)** श्री.पी.एस.निरभवणे
(५)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, पाणीपुरवठा विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.श्री.प्र.भणगे

| (६)**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,<br>पुणे महानगरपालिका, पुणे **(अ.क्र.१४६१ व १४६२)** श्री.मदन रामचंद्र आढारी<br>(६)**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, उपआयुक्त क्र.४,<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.अनिरुध्द घनश्याम पावसकर | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
| २०६ | दि. ३.८.२००६ | दि.१६.८.२००६ | दि.२९.८.२००६ | दि.१.९.२००६ |
| १८२ | दि.१९.६.२००६ | दि.११.७.२००६ | दि.२८.७.२००६ | दि.-- |
| १८३ | दि. १७.५.२००६ | दि. १५.६.२००६ | दि. १४.७.२००६ | दि. २६.७.२००६ |
| १८४ | दि. ३.७.२००६ | दि. १.८.२००६ | दि. ३.९.२००६ | दि. |
| तक्रार-८६ | दि. ४.१.२००७ | दि. २३.२.२००७ | दि. | दि. |
| १८५+२०५ | दि.२३.६.२००६ | दि.२८.७.२००६ | दि.३१.७.२००६ | |
| २०७ | दि.३.७.२००६ | दि.१.८.२००६ | दि.३.८.२००६ | |
| ११०७ | दि.६.४.२००७ | २३.५.२००७ | १७.५.२००७ | २५.६.२००७ |
| १४६० | दि.२१.९.२००७ | दि.११.१०.२००७ | दि.३१.१०.२००७ | |
| १४६१ | दि.१०.१०.२००७ | | दि.१३.११.२००७ | |
| १४६२ | दि.२८.९.२००७ | दि.८.९.२००७ | दि.१३.११.२००७ | |

## विवेचन

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अधिक कार्यक्षमतेने व नागरिकांना अधिक उपयुक्त ठरेल अशा पध्दतीने अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.विहार शिवाजीराव दुर्वे यांनी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त व अन्य अधिकारी यांच्याशी केलेला पत्रव्यवहार, विविध प्रकारच्या सूचना व माहिती मागणारे अर्ज या अनुषंगाने आयोगाकडे ११ अपिले व एक तक्रारअर्ज केला आहे. या सर्व अपिलांच्या संदर्भात आपल्याला पूर्ण माहिती दिली गेली नाही. तसेच आपल्या सूचनांबाबत अधिक गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे, असे

प्रतिपादन श्री.दुर्वे यांनी केले. मात्र श्री.दुर्वे याच्या मूळ अर्जांनुसार वेळोवेळी उत्तरे व माहिती देण्यात आली. तसेच श्री.दुर्वे यांच्या सूचनांची दखल घेऊन त्यानुसार त्यांच्याशी चर्चाही करण्यात आली, असे प्रतिपादन अधिकाऱ्यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४अन्वये सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंस्फूर्तीने जाहीर करावयाची माहिती वृत्तपत्रांकडे / पुणे श्रमिक पत्रकार संघाकडे द्यावी, नागरिक व महानगरपालिकेचे अधिकारी यांच्यातील चर्चेचे व्हिडिओ शूटिंग करण्यास परवानगी द्यावी व अशी परवानगी देता येत नसल्यास का देता येणार नाही याचे स्पष्टीकरण करावे, आतापर्यंत अशी परवानगी किती जणांना दिली ते जाहीर करावे, अशा स्वरुपाच्या सूचनांचा विस्तृत पत्रव्यवहार श्री.दुर्वे यांनी महानगरपालिकेशी केला असून त्या अनुषंगाने माहिती मागितली आहे. (अपील क्रमांक -१८३,१८४,२०७,१८२, १८५,२०५)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत जन माहिती अधिकाऱ्यांना झालेली शास्ती, त्याबाबतच्या चलनांच्या प्रती (अ.क्र.१४६०), मंजूर टीडीआर पेक्षा बेकायदेशीरपणे केलेले जादा बांधकाम पाडण्याबाबतची कारवाई, न्यायालयांचे त्याबाबतचे निकाल, तसेच आपण केलेल्या अर्जांवरील दैनंदिन कार्यवाहीचा अहवाल (अ.क्र.१४६१, १४६२), पुणे महानगरपालिकेमध्ये चार्टर्ड अकाऊंटंटस् इन्स्टिट्यूटच्या लेखाविषयक मानकांची कार्यवाही पुणे महानगरपालिकेत करण्याची सूचना (अ.क्र.२०६), मिळकत करासंबंधात न्यायालयात दाखल असलेल्या दाव्यांची सन १९९६ ते २००६ या काळातील माहिती, थकबाकीदारांची यादी, कर आकारणी व कर संकलनविषयक माहिती वेबसाईटवर जाहीर करणे(तक्रार क्र.८६), पर्वती जलकेंद्रात झालेल्या अपघाताचे नेमके कारण (अ.क्र.११०७) असे विविध विषय श्री.दुर्वे यांनी व्यापक पत्रव्यवहाराद्वारे व अर्जाद्वारे मांडले आहेत. जनहिताच्या दृष्टीने आपण विविध सूचना केल्या असून त्यानुसार कार्यवाही व्हावी, महानगरपालिकेच्या कारभारात अधिकाधिक पारदर्शकता यावी व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही करावी, तसेच या कायद्याच्या कलम ४ ची पूर्णपणाने अंमलबजावणी करुन

महानगरपालिकेने कारभाराची सर्व माहिती नागरिकांना उपलब्ध ठेवावी, अशी आपली मागणी असल्याचे श्री.दुर्वे यांनी विविध अर्जांमध्ये व पत्रव्यवहारात नमूद केले आहे, सुनावणीत त्यांनी त्याचा पुनरुच्चार केला. अनेक विषयाबाबत आपल्याला विहित मुदतीत माहिती दिली गेली नसल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. मात्र श्री.दुर्वे यांनी प्रत्येक अर्जात विस्तृत माहिती मागितली असून विहित मुदतीत त्यांना उत्तर देणे व संकलन करुन माहिती देणे असा प्रयत्न करण्यात आला. तसेच अनेक अर्ज व अपिलांमध्ये त्यांनी माहिती मागितलेली नाही, तर कामकाजविषयक सूचना केल्या आहेत. त्याबाबतचे उत्तरही वेळोवेळी त्यांना देण्यात आले. तसेच समक्ष चर्चाही करण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केले. आपल्या निवेदनाच्या पृष्ट्यर्थ त्यांनी पूरक कागदपत्रे सादर केली.

श्री.दुर्वे यांनी अर्जांमध्ये विस्तृत माहिती मागितली आहे, तसेच काही अपिलांमध्ये (अ.क्र.२०६) मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती प्रथम अपिलात मागितली आहे. माहितीच्या मागणीबाबतही स्वतंत्र पत्रव्यवहार, अधिकाऱ्यांबरोबरची चर्चा आणि माहितीच्या अधिकारातील अर्ज अशा तिन्हींची सरमिसळ श्री.दुर्वे यांनी केली आहे. त्यामुळे उत्तरांमध्ये नेमकेपणा राखण्यावर परिणाम होतो, व त्याची नेमक्या स्वरुपात छाननी होऊ शकत नाही, याची दखल श्री.दुर्वे यांनी घेणे आवश्यक आहे. त्याबरोबरच संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनीही अनेक बाबींविषयीचा एकत्रित पत्रव्यवहार केल्याचे दिसते. त्यांनीही विहित मुदतीत व मुद्देनिहाय उत्तरे देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.युगानंद गुलाबराव साळवे
आशानगर को-ऑप हौ.सो.लि.,
सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०५६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** विभागीय उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६८/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.युगानंद गुलाबराव साळवे
आशानगर को-ऑप हौ.सो.लि., सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०५६

**अपिलीय प्राधिकारी तथा** विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ श्री.सुनिल पवार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.०२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.०३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०५.०३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.०४.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** सहकार मंत्री, श्री.पतंगराव कदम यांनी श्रीमती शांताबाई भास्करराव भोसले यांच्या दि.२४.०४.२००५ रोजी दिलेल्या अर्जावर हिरव्या शाईत दिलेल्या आदेशाची माहिती दोन वेळा माहितीच्या अर्जावर माहिती देण्यास नकार दिला त्याबाबत माहिती. | |

## विवेचन

श्रीमती शांताबाई भास्करराव भोसले यांच्या अर्जावरील महसूलमंत्र्यांच्या शेऱ्याची प्रत ही संचिका गायब केली असल्यामुळे आपल्याला दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.युगानंद गुलाबराव साळवे यांनी केले.

श्रीमती भोसले यांनी दि.२४.४.२००५ रोजी केलेल्या अर्जाविषयीची माहिती श्री.साळवे यांनी मागितली आहे. परंतु संबंधित कागदपत्रे दप्तरी आढळून येत नसल्यामुळे ही प्रत देता येणार नाही, असे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले. प्रथम अपिलातही तोच निर्णय कायम करण्यात आला. त्यांनी नमूद केलेली कागदपत्रे वर्गवारीनुसार एक वर्ष जतन करण्याची आहेत, असे अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल पवार यांनी सांगितले.

अतिमहत्त्वाच्या व्यक्तींकडून होणाऱ्या पत्रव्यवहाराची वेगळी नोंद शासकीय कार्यालयांमध्ये असते. त्यात शोध घेऊन संबंधित अर्जावरील महसूलमंत्र्यांचा शेरा नेमका काय आहे, याची माहिती अपीलकर्त्यास एक आठवड्यात द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाच्या आदेशानुसार आपल्या कार्यालयाने चार ते पाच दिवस विशेष शोध मोहिम घेतली असता सदरची धारिका प्राप्त झाली व श्री.साळवे यांना संबंधित अर्जाची प्रत घेऊन जाण्याबाबत कळविले, असे अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे श्री.सुनिल पवार यांनी दि.६.१०.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. श्रीमती शांताबाई भास्करराव भोसले यांच्या मूळ अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहितीही त्यांनी अहवालात नमूद केली आहे. श्री.साळवे यांना संबंधित प्रत दिली गेली का, याची विचारणा आयोगाने केली असता, श्री.साळवे व्यक्तिशः माहिती नेणार होते, परंतु ते न आल्यामुळे त्यांना दि.२२.१०.२००९ रोजी रजिस्टर्ड टपालाने संबंधित प्रत पाठविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे श्री.डी.टी.भापकर यांनी दि.२२.१०.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६ .१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.शिवाजी संभाजी सातकर
ग्रंथालय लिपीक, द्वारा हुतात्मा राजगुरु महाविद्यालय,
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विभागीय संचालक,
उच्च शिक्षण, १७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** सहसंचालक,
उच्च शिक्षण, १७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९८/ पुणे +तक्रार क्र.४१६/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विभागीय संचालक,
उच्च शिक्षण, १७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-१ डॉ.एन.एम.कडू
**जन माहिती अधिकारी तथा** सहसंचालक,
उच्च शिक्षण, १७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-१ श्री.ए.व्ही.सोरटे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०८.०१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०७.०२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.०३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.०५.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** <br><br> माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या ११ प्रलंबित मागण्यांविषयीच्या निवेदनाबाबत महविद्यालयाच्या व्यवस्थापनाला बोलाविले नाही व सेवाज्येष्ठता आदीबाबतचा सुनावणीचा योग्य निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे मिळालेला नाही. कार्यालयातील सर्वच पदोन्नत्या व काही नेमणुका सेवाज्येष्ठता, गुणवत्ता व शैक्षणिक पात्रता डावलून केल्यामुळे बेकायदेशीर आहेत. त्याबाबत मूल्यांकन करण्याचे हेतुपुरस्सर टाळले जाते. फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याबाबत दि.२१.११.२००६ रोजी आपण दिलेल्या पत्रानुसार कारवाई केलेली नाही. तसेच माहिती चुकीची, अपुरी व दिशाभूल करणारी दिली आहे, त्याबद्दल शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी संभाजी सातकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

श्री.सातकर यांनी मांडलेले मुद्दे प्रशासकीय कार्यवाहीशी निगडित असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार 'माहिती'च्या व्याख्येत समाविष्ट होत नाहीत. त्यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आले. त्यांच्या प्रशासकीय स्वरूपाच्या मागण्या लक्षात घेऊन हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर यांचे प्राचार्य व अन्य अधिकारी यांच्यासह एकत्रित बैठक घेऊन चर्चा केली. श्री.सातकर यांच्या सहाय्यक ग्रंथपालपदी पदोन्नती मिळण्याच्या मागणीसह सर्व मुद्दयांचा समावेश या चर्चेत होता. चर्चेचा मुद्देनिहाय अहवाल उभय बाजूंना देण्यात आला आहे. तसेच या मुद्दयांबाबत महाविद्यालयाने कार्यवाही केली आहे. तरीही संस्थेचे सचिव व प्राचार्य यांच्या समक्ष पुन्हा सुनावणी ठेवण्याची मागणी श्री.सातकर सातत्याने करतात, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय संचालक, उच्च शिक्षण, १७ आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे डॉ.एन.एम.कडू यांनी लेखी व तोंडी केले.

श्री.सातकर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तही संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह सुनावणी घेण्याची मागणी नमूद केली आहे.

श्री.सातकर सुनावणीच्या वेळेस महाराष्ट्र प्रदेश झोपडपट्टी सुरक्षा दल, पिंपरी शहर, जि.पुणे या संघटनेच्या २०-२५ कार्यकर्त्यांना बोलावतात व आपल्या कार्यालयावर दबाव आणतात, असेही डॉ.कडू यांनी लेखी व तोंडी नमूद केले. दि.१४.५.२००८ रोजी डॉ.कडू यांच्या कार्यालयात झालेल्या प्रथम अपिलावरील सुनावणीला महाविद्यालयाचे पदाधिकारी व या संघटनेचे प्रतिनिधीही उपस्थित होते आणि चर्चेचा अहवाल त्यांनाही देण्यात आला आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. अशा प्रकारे कार्यकर्त्यांसह सुनावणीला जाणे व विशिष्ट पध्दतीनेच सुनावणी करण्यासाठी भाग पाडण्याचा प्रयत्न करणे ही अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

श्री.सातकर यांच्या अर्जातील मुद्दयांमध्ये नियुक्त्यांच्या वैधतेबाबतचे भाष्य असून प्रशासकीय कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे. मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तरीही त्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची चर्चा अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढील सुनावणीच्या अहवालात नमूद आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेबाहेर जाऊन मूळ प्रश्नावरील प्रशासकीय कार्यवाहीच्या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय संचालक, उच्च शिक्षण, १७ आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे डॉ.एन.एम.कडू यांनी कृती केली, ही बाब प्रशंसनीय आहे. या स्वरूपात पुन्हा सुनावणी घेण्याची अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार योग्य नाही.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

ॲड. स. भा. रेपाळे — अपीलकर्ता
९ अ ३ राजमयूर सोसायटी नं.२,
एरंडवणा गावठाण, पुणे-४११ ००४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११८ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** ॲड. स. भा. रेपाळे
९ अ ३ राजमयूर सोसायटी नं.२, एरंडवणा गावठाण, पुणे-४११ ००४

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रवीण वामन गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. श्रीकांत वायदंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

## ८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन पुणे शहर शाखा, सचिव ॲड. स.भा. रेपाळे यांचे दि.२०.७.२००४ चे आयुक्तांना दिलेले पत्र, व सदर पत्राच्या अनुषंगाने महानगरपालिकेने जी कारवाई केली त्याची सविस्तर माहिती

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १२.८.२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपण बेकायदेशीर बांधकामाबाबत दि. २०.७.२००४ रोजी महानगरपालिका आयुक्तांना दिलेल्या पत्रावर महानगरपालिकेने केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी ते पत्र उपलब्ध नसल्याच्या कारणावरुन माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग यांनी प्रथम अपिलाची दखल घेतली नाही व काकडे बिल्डर्सच्या बेकायदेशीर बांधकामावर कारवाई केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता ॲड. स.भा. रेपाळे यांनी केली.

ॲड. रेपाळे यांचा अर्ज विकास योजना विभागाने बांधकाम नियंत्रण विभागाकडे पाठविला. ॲड. रेपाळे यांचे दि.२०.७.२००४ चे पत्र रेकॉर्डमध्ये उपलब्ध होत नसल्याने त्यावरील कार्यवाहीची माहिती देता येत नाही. मूळ पत्राची प्रत दिल्यास माहिती देण्यात येईल, असे बांधकाम नियंत्रण विभागाने कळविले. परंतु ॲड. रेपाळे यांच्याकडे वेळोवेळी मागणी करुनही मूळ पत्राची प्रत त्यांनी दिली नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. श्रीकांत वायदंडे नमूद केले. मूळ पत्राची प्रत आपल्याकडे नाही व पत्र पाठविल्याचे प्रमाणपत्र आपण टपाल खात्याकडून घेतले नाही, असे ॲड. रेपाळे यांनी सांगितले.

ॲड. रेपाळे यांनी केलेल्या अपिलानुसार माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यापूर्वी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त ॲड. रेपाळे यांना सात दिवसात माहिती देण्याचे निर्देश आयोगाने दिले. त्यानुसार प्रत्यक्ष मिळकतीत संयुक्त जागा पाहणी होऊन मान्य नकाशाव्यतिरिक्त जागेवर कोणतेही बांधकाम आढळून येत नसल्याचे व आवश्यक असल्यास शुल्क भरल्यानंतर मान्य नकाशाची प्रत देण्यात येईल, असे ॲड. रेपाळे यांना

दि. २४.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले, असे जन माहिती अधिकारी श्री. श्रीकांत वायदंडे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

संबंधित अर्जाबाबत एक आठवडयात शोध घ्यावा, तसेच विषयांकित प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. आपल्या अर्जाची महापालिकेच्या आवक बारनिशीत नोंद असल्याचे आढळले असे ॲड. रेपाळे यांनी दि.२९.८.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. ॲड. रेपाळे यांचा अर्ज आयुक्त कार्यालयातून नगर अभियंता कार्यालयाकडे पाठविल्याचे नोंदीवरून निदर्शनास येत आहे. नगर अभियंता कार्यालयाकडील आवक प्रकरणाच्या नोंदी २००४ साली संगणकावर होत्या. त्या काळातील संगणक नोंदी करप्ट झाल्या, व मूळ तक्रारीचे उत्तर देण्यात आले आहे, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता, पुणे महानगरपालिका श्री. प्रवीण वामन गेडाम यांनी दि.२२.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

वरील बाबी लक्षात घेता माहिती नाकारण्याचा हेतुतः प्रयत्न जन माहिती अधिकारी श्री. श्रीकांत वायदंडे अथवा अपिलीय प्राधिकारी श्री प्रवीण वामन गेडाम यांनी केलेला दिसत नाही. बेकायदेशीर बांधकामावर कारवाई करण्याची ॲड. रेपाळे यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १३.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.अशोक शिवाजी गायकवाड
ऑर्डनन्स फॅक्टरी, इस्टेट टाईप १,४१/५,
देहुरोड, पुणे - ४१२ ११३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती खेड, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती खेड, जि.पुणे प्रतिनिधी श्री.जी.बी.बेंडे

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जि.पुणे श्री.एस.बी.भाकरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.०१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०७.०३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.०४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.०६.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br><br>मौजे कुरुळी येथील जमीन गट नं.४३१ मध्ये श्री.संतोष वासुदेव मुंगसे यांचे घराची नोंद कोणाच्या शिफारशी किंवा सांगण्यानुसार केली? त्यांचे खरेदीखत व ७/१२ आपण पाहिला काय? असल्यास सत्यप्रत मिळावी घरबांधणीसाठी परवानगी मागितलेल्या अर्जाची नक्कल इत्यादी अनुषंगिक मुद्दे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती परिपूर्ण मिळाली असून संबंधित बांधकाम कायदेशीर असल्याची आपली खातरजमा झाली आहे. आपला अर्ज निकाली काढावा, असे अपीलकर्ता श्री.अशोक शिवाजी गायकवाड यांनी दि.६.८.२००९ रोजी लेखी निवेदन दिले असून त्याची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कुरुळी, ता.खेड, जि.पुणे यांनी आयोगाला सुनावणीच्या वेळी सादर केली.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२०.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. विलास बापूराव मोहरीर
३०, नरसिंग गिरजी मील हौसींग सोसायटी,
होटगी रोड, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगर परिषद प्रशासन संचालनालय, दिल्ली गेट,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नळदुर्ग नगरपरिषद, नळदुर्ग
ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता :-** श्री. विलास बापूराव मोहरीर<br>३०, नरसिंग गिरजी मील हौसींग सोसायटी, सोलापूर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि २०.०३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.०४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.०५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.०६.२००६ |
| | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>सौ. भाग्यवती मोहरीर यांना नगरपरिषद, नळदुर्ग ने मंजूर केलेल्या बांधकाम परवान्यासोबत त्यांनी क्षेत्रफळाची नोंद असलेल्या कागदपत्रांची मागणी केली आहे का, व त्यांनी ती कागदपत्रे सादर केली का, असल्यास त्याच्या सत्यप्रती इत्यादी. | |

## विवेचन

अपीलकर्ते श्री. विलास बापूराव मोहरीर यांनी बांधकामाबाबत माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, नळदुर्ग यांच्याकडे मागितली होती, राज्य माहिती आयोगाने दि. १७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपिलकर्त्याच्या याच मागणीवरील अन्य अपिलाचा निर्णय आयोगाने यापूर्वी (अ.क्र. ६४/ सोलापूर, दि.२९/१२/२००७) दिला आहे, हे अपीलकर्त्यानी मान्य केले. पुन्हा त्याच माहितीच्या मागणीसाठी अर्ज/ अपील करणे योग्य नाही. तसेच बांधकाम, अतिक्रमण याबाबतचा भाष्य व खुलासा ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०. १०.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

डॉ.विक्रम सिंग
सी-२, विंग.१४, राजश्री व्हिला, भोसले पॅराडाईज,
रेंजहिल रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७६ + २१७७/ पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.०८.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता-** डॉ.विक्रम सिंग<br>सी-२, विंग.१४, राजश्री व्हिला, भोसले पॅराडाईज,<br>रेंजहिल रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,<br>विकास योजना विभाग,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ श्री.मदन रामचंद्र आढारी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,<br>विकास योजना विभाग,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ श्री.अनिरुध्द घन:श्याम पावसकर | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०२.०८.२००७ व / दि.१५.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.०८.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.१०.२००७ व / दि.१०.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०६.११.२००७ व / दि.१८.०१.२००७ |

| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>शिवाजीनगर स.नं.२०९/३ 'राजश्री व्हिला', सी-२ या इमारतीतील काही सदनिका धारकांनी केलेल्या वाढीव बांधकामाबाबत केलेल्या कारवाईविषयीची माहिती |
|---|---|

## विवेचन

इमारतीतील काही सदनिकाधारकांनी केलेल्या वाढीव बांधकामाबाबत केलेल्या कारवाईविषयीची माहिती जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानरगपालिका, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, विकास योजना विभाग,पुणे महानरगपालिका, पुणे यांच्या पातळीवर आपल्याला चुकीची व अपुरी दिली गेली. त्यामुळे पुणे महानगरपालिकेवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता डॉ.विक्रम सिंग यांनी राज्य माहिती आयोगाकडील दोन अपिलांमध्ये केली आहे.

वारंवार मागणी करुनही आपल्याला माहिती दिली जात नाही व अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरुध्द कारवाई केली जात नाही, असे प्रतिपादन डॉ.विक्रम सिंग यांनी केले.

डॉ.विक्रम सिंग यांनी १३ मुद्दयांची माहिती मागितली होती. त्यात संबंधित मिळकतीवरील टी.डी.आर.चाही समावेश होता. डॉ.विक्रम सिंग यांनी याबाबत अनेकदा तक्रार अर्ज केले आहेत. त्यानुसार जागेवर प्रत्यक्ष पाहणी करुन सर्व संबंधितांना अनधिकृत बांधकामाबाबत नोटिसा देऊन नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. हा सर्व तपशील डॉ.विक्रम सिंग यांना वेळोवेळी देण्यात आला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अनिरुध्द घन:श्याम पावसकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले. डॉ.विक्रम सिंग यांना संपूर्ण फाईल पाहण्यास देऊन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती द्याव्या, असा आदेश आपण अपिलात दिला होता. त्यानुसार सर्व कागदपत्रे त्यांना दाखविण्यात आली आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. मदन रामचंद्र आढारी यांनी नमूद केले.

विकसक / प्रवर्तक यांनी पॉवर ऑफ ॲटर्नी संदर्भात दाखल केलेल्या इंडेम्नीटी बाँडची प्रत द्यावी व महानगरपालिकेने त्याबाबत कोणती कृती केली याची माहिती द्यावी, अशी मागणी डॉ.विक्रम सिंग यांनी केली. त्यांनी स्वतः प्रतिज्ञापत्र (फार्मझेड) दाखल केल्याचे सुनावणी दरम्यान सांगितले. त्याची प्रत त्यांच्याकडून घ्यावी व संपूर्ण संदर्भातील अहवाल आयोगास ३ दिवसांत द्यावा, असे मौखिक आदेश सुनावणीच्या वेळी दिले. बांधकाम अनधिकृत आहे की नाही, असल्यास ते पाडले का नाही, आदी बाबी प्रशासकीय स्वरुपाच्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशा स्वरुपाची विचारणा 'माहिती' ठरत नाही. तथापि

महानगरपालिका अधिकाऱ्यांनी जागेवरील प्रत्यक्ष मोजणीसह अशा प्रकारची प्रशासकीय कार्यवाही केल्याचे कागदपत्रांवरुन दिसते.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार पूर्तता झाली नसून कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याची तक्रार डॉ.सिंग यांनी दि.०४.०९.२००८ रोजी आयोगाकडे केली. त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानरगपालिका, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, विकास योजना विभाग,पुणे महानरगपालिका, पुणे यांच्याकडून आयोगाने दि.२२.०९.२००८ च्या पत्रान्वये खुलासा मागविला. जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानरगपालिका, पुणे श्री.अनिरुध्द घनःश्याम पावसकर यांनी दि. ०४.१०.२००८ व १०.१०.२००८ रोजी खुलासा सादर केला. आयोगाच्या आदेशानुसार पूर्तता करण्यात आली असून डॉ.सिंग यांनी प्रतिज्ञापत्राबाबत विश्लेषण व कायदेशीर वैधतेची मागणी केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशी माहिती विचारता येत नाही. तसेच या विषयात दाखल असलेल्या दिवाणी न्यायालयात डॉ.सिंग वादी असून पुणे महानगरपालिका प्रतिवादी आहे. त्यामुळे त्याबाबत भाष्य करता येणार नाही, असे कळवून या विषयातील विधी सल्लागारांच्या अभिप्रायाची प्रत डॉ.सिंग यांना देण्यात आली आहे, असे या अहवालात नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास वेळोवेळी माहिती देण्यात आलेली आहे. केलेली कार्यवाही योग्य की अयोग्य, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अधिकाराच्या कक्षेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ०६ / १०/२००९**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

ॲड.जिजाबा नारायण जाधव
मु.पो.दहिवडी, ता.माण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माण (दहिवडी),
तहसील कार्यालय,माण(दहिवडी), ता.माण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माण (दहिवडी),
तहसील कार्यालय,माण(दहिवडी), ता.माण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माण (दहिवडी),
तहसील कार्यालय,माण(दहिवडी), ता.माण, जि.सातारा श्री.आर.आर.सोनटक्के

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माण (दहिवडी),
तहसील कार्यालय,माण(दहिवडी), ता.माण, जि.सातारा तत्कालीन श्री.जोगेंद्र कट्यारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.९.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१५.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.४.४.२००९ रोजी घेण्यात आली.

मौजे म्हसवड, तालुका माण, जि.सातारा येथील एका गटाच्या फेरफार आदी नोंदीबाबतच्या प्रती आपण मागितल्या होत्या.त्या जाणीवपूर्वक आपल्याला दिल्या जात नाहीत. जुजबी उत्तरे देऊन वेळकाढूपणाचे धोरण अवलंबून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माण (दहिवडी) श्री.जोगेंद्र कट्यारे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माण (दहिवडी), श्री.हेमंत निकम हे टाळाटाळ करीत आहेत. त्यांची चौकशी करुन कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता ॲड.जिजाबा नारायण जाधव यांनी अपील अर्जात व लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

ॲड.जाधव यांनी सन १९५० ते १९७८ -७९ या काळातील माहिती मागितली होती. संबंधित गटाचे सन १९६४ -६५ ते सन १९९०-९१ चे उतारे व मागणी केलेले फेरफार त्यांना पुरविण्यात आले. सन १९५० ते १९६३ चा ७/१२ उतारा अभिलेख कक्षात आढळ होत नसल्याचे देता येत नसल्याचे व तत्कालीन अभिलेख जीर्ण झालेले असल्याने उपलब्ध नाहीत, असे अभिलेख लिपीकांनी कळविल्याचेही त्यांना कळविले. संबंधित अभिलेख ब वर्गातील असल्यामुळे नाश केलेले आहेत. इतर हक्कातील खाडाखोडी कशा झाल्या, एकाच तलाठ्याने केल्या का, कोणत्या शाईने केल्या, अशा स्वरुपाची माहिती ॲड.जाधव यांनी मागितली. अभिलेख निरीक्षणासाठी त्यांनी यावे, असे कळविले. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसित झालेला

असतानाही, त्याची दखल घेऊन माहिती दिली. हे सर्व मिराशी कूळ आहेत व कायमस्वरुपी कूळ आहेत. सन १९६६ नंतर मिराशी कूळ बंद झालेले आहे. आपल्याला हवी त्याच स्वरुपाची माहिती दिली जावी असा त्यांचा आग्रह असतो, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.जोगेंद्र कट्यारे व अपिलीय प्राधिकारी श्री.आर.आर.सोनटक्के यांनी केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता, ॲड.जाधव यांना देय माहिती देण्यात आली आहे. मत प्रदर्शित करणे अथवा भाष्य करणे अपेक्षित असलेली विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत करता येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.१०.२००९**